**आर.सी.सी क्र.२७८/२०२१** **निशाणी क्र.२५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२**

**मी शपथेवर कथन करतो की,**

नाव – बाळासाहेब भिवसेन काटकर,

वय – ५२ वर्षे, धंदा –मजुरी,

राहणार – पैठण रोड शेवगाव , ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**सरतपास**

**अभियोग पक्षातर्फे सहा सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. दराडे यांचे कडून–**

०१. दिनांक १४/०८/२०२१ रोजी शेवगाव पोलीसांनी मला घटनास्थळाचा पंचनाम्याला जाण्याकरिता बोलावले नव्हते. सदर दिवशी माझ्या समक्ष घटना ठिकाण चा पंचनामा केला नाही. दिनांक २७/०८/२०२१ रोजी शेवगाव पोलीसांनी मला पंचनाम्याला जाण्याकरिता बोलावले नव्हते. सदर दिवशी माझ्या समक्ष आरोपीने निवेदन देऊन जप्ती पंचनामा झाला नाही. मी पंचनाम्यावर सहया केल्या होत्या. आता मला घटनास्थळ व निवेदन पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर अनु.क्र.०२ वरील सहया माझ्या आहेत. त्यातील मजकूर मला माहित नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहा.सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासणीची परवाणगी मागीतली, परवानगी देण्यात आली)**

०२. म्हणणे खरे नाही की, दि.१४/०८/२०२१ रोजी शेवगाव पोलिस ठाण्याचे पोलीस नाईक श्री दराड यांनी पंचनाम्यास जाण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार त्यांनी माझ्या समक्ष सेवा जनरल हॉस्पीटल समोर घटनास्थळाचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा वाचुन दाखविल्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७/०८/२०२१ रोजी मला पोलीस नाईक श्री. दराडे यांनी पोलीस स्टेशन शेवगाव येथे बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी पो. नां. दराडे यांनी मला असे सांगितले की, गुन्हा रजि. क्र.४९३/२०२१ मधील आरोपी निवेदन देत असुन ते तुमच्या समक्ष लिहुन घ्यायचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपीने त्याचे नाव जावेद अहमद शेख असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याने सांगितले की, त्याने एक हिरो होन्डा मोटार सायकल चारुन आणली असुन ती ज्या ठिकाणी ठेवली आहे ते ठिकाण दाखवितो. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे सदर आरोपीचे निवेदन लिहुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार सदर आरोपी, पोलीस व मी खाजगी वाहनाने सदर ठिकाणी गेलो. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपीने त्याचे घराच्या आडोश्याला ठेवलेली एक निळया रंगाचे पट्टे असलेली हिरो होन्डा स्प्लेंडॉर मोटार सायकल होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदर मोटार सायकल माझे समक्ष जप्त केली व त्या प्रमाणे जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, मी सही करण्यापूर्वी कोणताही कागद वाचून त्यानंतर त्यावर सही करत असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर पंचनामे वाचुन पाहिल्या नंतरच त्यावर सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस वाचवण्या करीता मी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास**

**आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एल. एच. लांडे यांनी उलटतपास नाकारला.**

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

VAISHALI SANJAY MORE
Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.02.16 12:56:21 +0530

दिनांक– १६/०२/२०२६

(वैशाली सं. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.